# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
## लिपिक टंकलेखक पदभरती परीक्षा (८ जून, २०१४)

१) पुढे दिलेल्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द निवडा – ऐहिक
A) प्राकृतिक B) विदेही C) पारलौकिक D) लौकिक

२) मोजक्या शब्दात सांगितलेले तत्त्व – .........
A) मंत्र B) सूत्र C) ओवी D) स्मृती

३) पुढे दिलेल्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द निवडा – निरभ्र
A) अभ्र B) अंबर C) सौरभ D) अभ्राच्छादित

४) ''डोळ्यांचे पारणे फिटणे'' या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.
A) अस्वस्थ वाटणे B) समाधान वाटणे C) पूजा करणे D) निघून जाणे

५) ''गड आला पण सिंह गेला'' हे कोणत्या प्रकारचे वाक्य आहे.
A) मिश्र वाक्य B) संयुक्त वाक्य C) साधे वाक्य D) केवल वाक्य

६) ''अय्या'' हा शब्द खालीलपैकी कोणत्या भाषेतून मराठी भाषेत आला आहे ?
A) फारसी B) हिंदी C) अवधी D) तामिळ

७) पुढील अलंकारिक शब्दाचा अर्थ स्पष्ट करणारा योग्य पर्याय निवडा – शुंभ.
A) दोरखंड B) धडधाकट पण निर्बुद्ध व्यक्ती
C) दोरखंडाचा पीळ D) पराक्रमी व्यक्ती

८) पुढील समास ज्या शब्दात आहे तो शब्द ओळखा – बहुव्रीही समास.
A) त्रिभुवन B) जितेन्द्रिय C) मीठभाकर D) मुखचंद्र

९) काही सामाजिक व्यथा व्यक्त करणारे लेखक व त्यांच्या साहित्यकृती यांच्या जोड्या दिलेल्या आहेत. त्यापैकी कोणती जोडी चुकीची आहे ?
A) दया पवार – बलुतं B) लक्ष्मण माने – उपरा
C) लक्ष्मण गायकवाड – उचल्या D) शंकरराव खरात – कोंडवाडा

१०) ''विनाकारण'' हा खालीलपैकी कोणत्या प्रकारचा शब्द आहे ?
A) उपसर्गघटित B) प्रत्ययघटित C) अभ्यस्त D) सिद्ध

११) तुमच्या परीक्षा कधी सुरु होणार ? ही वाक्यरचना कोणत्या प्रकारची आहे ?
A) विध्यर्थी B) प्रश्नार्थी C) उद्गारार्थी D) विधानार्थी

१२) ''घरोघरी मातीच्या चुली'' या म्हणीचा अर्थ ओळखा ?
A) चुली या मातीच्याच असतात. B) प्रत्येक घरी चुलींची गरज असते.
C) एखाद्याला घरचा शत्रू असणे. D) सर्वत्र सारखीच परिस्थिती असणे.

१३) खालीलपैकी नपुसकलिंगी शब्द ओळखा.
A) रुमाल B) देह C) ग्रंथ D) शरीर

१४) ''आमिषाने पुस्तक वाचले'' या वाक्यातील प्रयोग ओळखा.
A) भावे B) कर्तरी C) कर्मणी D) कर्मकर्तरी

१५) 'वर चढणे' यासाठी खालीलपैकी कोणता पर्यायी शब्द संयुक्तिक ठरतो ?
A) अवरोहण B) आरोहण C) अवतरण D) अनुकरण

१६) ''इतिश्री होणे'' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
A) सुरुवात होणे B) शेवट होणे C) आरंभ होणे D) मध्यंतर होणे

१७) खालील पर्यायातून विसंगत असणार शब्द ओळखा .
A) आस B) आकांक्षा C) मनिषा D) सुषमा

१८) <u>चतुर</u> या शब्दाचा विशेषणाचा प्रकार ओळखा.
A) नामसाधित विशेषण B) अव्ययसाधित विशेषण C) गुण विशेषण D) सर्वनामिक विशेषण

१९) एकाएकी होणारा मोठा बदल.

A) उत्क्रांती B) अविश्रांत C) विश्रांती D) क्रांती

२०) दामिनीचा समानार्थी शब्द ?

A) विनीता B) चपला C) आत्मजा D) क्षमा

२१) एका गावात १५,००० लोकसंख्येपैकी १/५ स्त्रिया, ३/५ पुरुष असून उर्वरित बालके आहेत. तर बालकांची संख्या किती ?

A) ४,००० B) ३,००० C) ५,००० D) १,०००

२२) अजिंक्यने एका पुस्तकाचा २/८ भाग वाचला होता. आज त्याने १२ पाने वाचली. तेव्हा पुस्तकाची ७२ पाने शिल्लक राहिली तर त्या पुस्तकाची पाने किती ?

A) २२२ B) ११२ C) १३२ D) ११४

२३) एक काम करण्यास २५ मजुरांना १० दिवस लागतात तर तेच काम मजुरांची संख्या ५ ने कमी केंल्यास किती दिवस लागतील ?

A) १२.५ दिवस B) ३६ दिवस C) ३४.५ दिवस D) ३७.५ दिवस

२४) सोमवार, मंगळवार व बुधवार चे सरासरी तापमान ३६° आहे. मंगळवार, बुधवार व गुरुवार चे सरासरी तापमान ४१° आहे. गुरुवार चे तापमान ४३ ° असेल तर सोमवारचे तापमान किती ?

A) २८° B) ३०° C) ४०° D) ४२°

२५) ५६,३२,४८,४२ आणि 'क्ष' या संख्येची सरासरी ४३ येते तर 'क्ष' ची किंमत किती ?

A) ३७ B) ४१ C) ४४ D) ४६

२६) ३० रु. डझन या भावाने ३० फाऊंटन पेन खरेदी करुन ते सर्व विकले. प्रत्येक पेन ३ रुपयांस विकला असेल तर किती टक्के नफा झाला ?

A) २०% B) २४% C) २५% D) ३०%

२७) १०० मीटर लांबीची एक आगगाडी एका खांबास ९ सेकंदात ओलांडते तर गाडीचा दर ताशी वेग काय?

A) ४० कि. मी./तास B) ४५ कि. मी./तास C) ५० कि. मी./तास D) ५५ कि. मी./तास

२८) १२६० रुपयांस गाय खरेदी केली तिला घरी आणण्यासाठी १४० रुपये खर्च आला. पुढे ती गाय विकली, त्यामुळे १५% नफा झाला तर ती गाय किती किंमतीस विकली असावी ?

A) १,७०० रु. B) १,६१० रु. C) १,६५० रु. D) १,८०० रु.

२९) ४ मीटर – ४० से. मी. = किती मीटर ?

A) ३.४ मीटर B) ३.६ मीटर C) ३.८ मीटर D) ३.२ मीटर

३०) १,६०० रुपये मुद्दलाचे शेकडा १५ रु. दराने ३ वर्षांनी व्याज किती होईल ?

A) ८२० रुपये B) ७५० रुपये C) ७२० रुपये D) ७१० रुपये

३१) पुढील संख्याचे मध्यमान किती येईल ?

३९६, ३८४, ३६९, ३६५, ४१२, ४०८

A) ३८९ B) ४८९ C) ३७८ D) २८४

३२) एका मजुराने ८ खड्डे दोन तासात खोदले तर आणखी दोन खड्डे खोदण्यास त्याला किती वेळ लागेल?

A) २५ मिनिटे B) ३० मिनिटे C) २२ मिनिटे D) २४ मिनिटे

३३) ६ मीटर लांब व ४ मीटर रुंद अशा खोली मध्ये २० सें. मी. लांब आणि २० सें. मी. रुंद मापाच्या किती फरशा बसतील?

A) ६०० B) ४०० C) ३०० D) ५००

३४) एका संख्येच्या २०% मधून २० वजा केल्यास २० उरतात, तर ती संख्या कोणती ?

A) १०० B) १८० C) २०० D) २३०

३५) एका विद्यार्थ्याने एका परीक्षेत २५ पैकी २० प्रश्न सोडविले. बरोबर उत्तरासाठी ४ गुण दिले जातात व चुकीच्या उत्तरासाठी २ गुण कापले जातात. या परीक्षेत त्याला ५० गुण मिळाले, तर त्याची किती उत्तरे चुकली आहेत?

A) ४ B) १० C) ५ D) ६

३६) एका सायकल ८५१ रुपयांस विकली, त्यामुळे ८% तोटा झाला तर सायकलची खरेदी किंमत किती रुपये असावी ?

A) ९२५ रुपये B) ९३० रुपये C) ९३५ रुपये D) ९४० रुपये

३७) माझ्याकडे १० रुपये आहेत. माझ्याकडे ३ रुपये कमी असते तर माझ्याकडील पैसे हे गणेशकडील पैशाच्या निमपट असते, तर गणेशकडे माझ्यापेक्षा किती रुपये अधिक आहेत ?

A) ३ रुपये B) ४ रुपये C) ५ रुपये D) ६ रुपये

३८) एका विद्यार्थ्याला ३० टक्के गुण मिळाल्याने आवश्यक गुणापेक्षा ३० गुण कमी मिळून तो नापास झाला. दुसऱ्या विद्यार्थ्याला ४२ टक्के गुण मिळाल्यामुळे त्याला आवश्यक गुणापेक्षा ४२ गुण अधिक पडले तर उत्तीर्ण होण्यासाठी किमान किती टक्के गुण मिळणे आवश्यक होते ? आणि एकूण परीक्षा किती गुणाची होती ?

A) ३५ टक्के, ६०० गुण B) ३२ टक्के, ५२० गुण C) ४० टक्के, ४०० गुण D) ३१ टक्के, ४५० गुण

३९) एका बाटलीत २५० मिली दूध या प्रमाणे ३.५ लिटर दूध भरण्यास किती बाटल्या लागतील ?
A) १६ B) १४ C) १२ D) १८

४०) १५% नफा घेऊन एक वस्तू ९२ रुपयास विकली जाते तर ती वस्तू १०० रुपयास विकल्यास शेकडा नफा किती ?
A) ८% B) २०% C) ३३.३% D) २५%

41) Choose the correct Antonym " Abundance
A) Scarcity B) Penalty C) Much D) Massive

42) Choose the correct spelling.
A) Ommited B) Omitted C) Ommitted D) Omited

43) Do not tease Mohan, he is very.......
A) Sensible B) Sensitive C) Sensuous D) Sane

44) She fell ......... the river.
A) in B) into C) within D) inside

45) Slavery still exists ....... certain tribes.
A) between B) among C) within D) in

46) He does not abide ........ the rule.
A) at B) of C) for D) by

47) Sita values her Mother's .........
A) advise B) advice C) addvice D) addvise

48) Which one of the following is the correctly spelt word ?
A) dialogue B) dialogue C) dialague D) dielague

49) Choose the antonym of the word : Frequent
A) Rare B) Always C) Timely D) Recurrent

50) Pick out the wrong formations of verbs from the words given.
A) mobile - mobilize B) liquid - liquidize C) general - generalize D) minimum - minimize

51) Select one word for the following expression - Not fit to be chosen
A) Inteligible B) Illegible C) Incredible D) Inedible

52) Heat the oil till it ........ to smoke.
A) has begun B) began C) will begin D) begins

53) He seldom indulges ........ drinking.
A) in B) on C) about D) with

54) Pick out the odd matching with reference to gender.
A) cock - hen B) father - mother C) husband - wife D) ox - bull

55) Choose the opposite word of 'entry'
A) Disentry B) Entire C) Exit D) Exhale

56) Choose the correct Spelling.
A) guidance B) guidence C) gaidance D) gaidence

57) Many People dies ...... plague.
A) of B) by C) with D) in

58) He insisted ........ seeing the documents.
A) at B) for C) to D) on

59) Choose the word which is the exact opposite of the given word - RELINQUISH
A)Possess B) Renounce C) Deny D) Abdicate

60) That which cannot be corrected.
A) Unintelligible B) Indelible C) Illegible D) Incorrigible

६१) रोग निदान करण्याकरिता शरीरातील एखाद्या भागाचा तुकडा काढून त्याची तपासणी करणे याला ......... म्हणतात.
A) एलिझा टेस्ट B) बायोप्सी C) एंजियोप्लास्टी D) वेस्टर्न ब्लॉक टेस्ट

६२) झाडाचे वय कशावरुन ठरवितात ?

A) झाडाच्या खोडावरील वर्तुळे B) पानांची संख्या C) पानांचा रंग D) झाडांची ऊंची

६३) 'पायरोमीटर' या उपकरणाचा उपयोग ........ साठी होतो.
A) उच्च तापमान मोजणे B) वायुचा दाब मोजणे C) हृदयाची स्पंदन मोजणे D) विद्युत प्रवाह मोजणे.

६४) 'सेवाक्षेत्र' म्हणजे अर्थव्यवस्थेतील ........ क्षेत्र होय.
A) प्राथमिक B) द्वितीयक C) तृतीयक D) चतुर्थक

६५) .......... यांना पूर्व आणि पश्चिम यांच्या समन्वयकाचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जाते ?
A) राजा राममोहन रॉय B) स्वामी दयानंद सरस्वती C) बाळशास्त्री जांभेकर D) ईश्वरचंद्र विद्यासागर

६६) 'सत्यमेव जयते' हे कोठून घेण्यात आले ?
A) गीता B) उपनिषद C) रामायण D) महाभारत

६७) भारतातील पहिली सार्वत्रिक निवडणूक ......... मध्ये झाली.
A) १९४७ B) १९४९ C) १९५० D) १९५२

६८) खालीलपैकी मुलभूत हक्क कोणता ?
A) संपत्तीचा हक्क B) मतदानाचा हक्क C) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क D) राजकीय हक्क

६९) 'सरदार सरोवर प्रकल्प' कोणत्या राज्यात आहे ?
A) महाराष्ट्र B) गुजरात C) आसाम D) केरळ

७०) भारतातील भूदान चळवळीचे जनक कोण ?
A) विनोबा भावे B) महर्षी कर्वे C) लोकमान्य टिळक D) महात्मा गांधी

७१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम खालीलपैकी कोणत्या वर्षी संमत करण्यात आला ?
A) १९५७ B) १९५८ C) १९६१ D) १९६२

७२) राष्ट्रीय युवा दिन केव्हा साजरा करतात ?
A) १२ जानेवारी B) १५ मार्च C) १० जानेवारी D) २० फेब्रुवारी

७३) 'पॅगोडा हा वास्तूचा प्रकार कोणत्या धर्माशी निगडीत आहे ?
A) हिंदू B) शीख C) बौद्ध D) ख्रिश्चन

७४) महाराष्ट्रात ........ हे जिल्हा नियोजन समिती चे अध्यक्ष असतात.
A) जिल्ह्याचे पालकमंत्री B) जिल्हाधिकारी
C) जिल्हा नियोजन अधिकारी D) मुख्य कार्यकारी अधिकारी

७५) भारतात हरितक्रांती कोणत्या दोन पिकांमध्ये सर्वाधिक यशस्वी झाली ?
A) गहू आणि तांदूळ B) भुईमूग आणि सीताफळC) तूर आणि सोयाबीनD) डाळिंब आणि केळी

७६) बीड मध्ये खालीलपैकी कोणत्या तालुक्याला इतर जिल्ह्याची सीमा लागत नाही ?
A) अंबाजोगाई B) बीड C) शिरूर कासार D) वडवणी

७७) बीड जिल्ह्यामध्ये किती महसूल उपविभाग आहेत ?
A) दोन B) चार C) पाच D) सहा

७८) माजलगांव येथे बांधण्यात आलेले धरण कोणत्या नदीवर आहे ?
A) तेरणा B) गोदावरी C) सिंदफना D) मांजरा

७९) सीताफळ संशोधन केंद्र खालीलपैकी कोणत्या ठिकाणी आहे ?
A) धारुर B) वडवणी C) अंबाजोगाई D) केज

८०) इतिहासात प्रसिद्ध असलेली पेशवे व निजाम यांची लढाई खालीलपैकी कोणत्या ठिकाणी झाली ?
A) परळी वैजनाथ B) नायगांव C) राक्षसभुवन D) सौताडा

## उत्तरे : जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

## लिपीक नि टंकलेखक भरती परीक्षा - २०१४. (दि. ८ जून.२०१४)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1-C | 2-B | 3-D | 4-B | 5-B | 6-D | 7-B | 8-B | 9-D | 10-A |
| 11-D | 12-D | 13-D | 14-C | 15-B | 16-B | 17-D | 18-C | 19-D | 20-B |
| 21-B | 22-B | 23-A | 24-A | 25 -A | 26 -A | 27 -A | 28-B | 29-B | 30-C |
| 31-A | 32-B | 33-A | 34-C | 35-C | 36-A | 37-B | 38-A | 39-B | 40-D |
| 41-A | 42-B | 43-B | 44-B | 45-B | 46-D | 47-B | 48-B | 49-A | 50 -B |
| 51-B | 52-D | 53-A | 54-D | 55-C | 56-A | 57-A | 58-D | 59-A | 60-D |
| 61-B | 62-A | 63-A | 64-C | 65-A | 66-B | 67-D | 68-C | 69-B | 70-A |
| 71-B | 72-A | 73-C | 74-A | 75-A | 76-D | 77-C | 78-C | 79-C | 80-C |